MHBU070016062022



कि. फौ.प्रकारण क्र.२५४/२०२२ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज व पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन शेगांव शहर यांनी सादर केलेला अहवाल पाहिला. अर्जदाराने पटलावर, वाहन नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत तसेच मोबाईल बिलाची प्रमाणित सादर केली आहे. या कागदपत्राच्या अवलोकनार्थ अर्जदार हा जप्त Tata Ace Facelift HT BS IV या वाहन क्र. एम.एच २८ बी. बी. १६५९, चेचीस नं.MAT445553JVN76262 व इंजिन नं. 275IDI07NRYSJ2627 चा तसेच Vivo Y51A मोबाईल IMEI NO. 868501051529996 & 868501051529988 तो सदर वाहनाचा योग्य मागणीदार वाटतो.

२) शेगाव शहर पोलीस ठाणे यांनी सदर वाहन नोंदणीकृत मालकास परत देण्याबाबत हरकत दर्शविलेली आहे. तसेच पुढे त्यांनी खुलासा केला की सदरचे वाहन हे आरोपीने चोरीचा माल घेऊन जाण्याकरीता केला आहे तसेच जप्त मोबाईलचा त्याने चोरीकरीता वापर केला आहे. त्यामुळे सदरचे वाहन व मोबाईल अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देण्यास हरकत घेतली आहे. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी खुलासा सादर केलेला आहे.

३) सदर जप्त वाहन पोलीस ठाण्यात तसेच पडून राहील्यास सदर वाहनाचे नुकसान होवू शकते. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सुंदरभाई देसाई -वि- गुजरात राज्य, २००२ Supp (3) SCR, 39 या निर्णयविधीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मी अटी व शर्तीवर खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, शेगाव शहर यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी अपराध क्रमांक ४६८/२०२२ मध्ये जप्त Tata Ace Facelift HT BS IV या वाहन क्र. एम.एच २८ बी. बी. १६५९, चेचीस नं.MAT445553JVN76262 व इंजिन नं. 275IDI07NRYSJ2627 चा तसेच Vivo Y51A मोबाईल IMEI NO. 868501051529996 & 868501051529988 अर्जदार अजय संतोष गुरव यांना,

रु ३,२०,०००/- च्या ( अक्षरी रुपये तीन लाख वीस हजार मात्र )सुपूर्तनामा बॉण्डवर, ताबडतोब दयावे.

३. तपास अधिकरी यांनी अर्जदाराच्या खर्चाने सदरहू वाहनाचे व मोबाईलचे फोटो काढून त्याचा रितसर पंचनामा करुन ते दोषारोपपत्रासोबत जोडावे.

४. साक्षी पुराव्याचे वेळी आवश्यकता वाटल्यास अर्जदाराला सदरहू वाहनव मोबाईल न्ययालयासमक्ष हजर करावे लागेल.

५. अर्जदाराने प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत सदरहू वाहनामध्ये व मोबाईल मध्ये कोणत्याही प्रकारचे फेरबदल करु नये किंवा वाहनाची विल्हेवाट लावू नये.

स्वा/-

दिनांक :- ११-११-२०२२

(श्रीमती. व्ही. डी. साळवे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग २ रे कोर्ट शेगांव

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– के.एस.देशमुख,लघुलेखक ग्रेड–३(तदर्थ )

न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, शेगांव

दिनांकः– ११-११-२०२२